# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.02.2026** **वार:शनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून क्वालालंपूरच्या दोन दिवसीय दौऱ्यावर
2. राष्ट्रीय सल्लामसलत आणि रणनीती परिषद मध्य प्रदेशातील अमलाहा इथं आजपासून सुरू
3. 50 षटकांच्या सामन्यांच्या युवा विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत इंग्लंडला हरवून भारत विजेता आणि
4. 20 षटकांच्या सामन्यांच्या पुरुष विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात

**पंतप्रधान-क्वालालंपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा क्वालालंपूरचा दोन दिवसीय दौरा आज सुरु होत आहे. या दौऱ्यात भारत आणि मलेशिया त्यांच्या सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला अधिक दृढ करण्यासह द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण पैलूंचा आढावा घेतील. दोन्ही पक्ष पारंपरिक क्षेत्रांच्या पलीकडं जाऊन संबंध विस्तारण्याचा प्रयत्न करत असल्यानं, व्यापार आणि अर्थव्यवस्था, उदयोन्मुख तंत्रज्ञान, ऊर्जा आणि शिक्षण यासह प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य मजबूत करण्यावर दोन्ही बाजूंकडून भर दिला जाईल, असं मलेशियातील भारताचे उच्चायुक्त बी.एन. रेड्डी यांनी सांगितलं. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी मलेशियातील भारतीय समुदायाशीही संवाद साधतील. दोन्ही देशांमधील जनतेच्या मजबूत संबंधांचं प्रतीक म्हणून क्वालालंपूरमध्ये 'सेलामत दातांग मोदी जी' हा मोठा सामुदायिक कार्यक्रम आयोजित केला जाईल.

**मध्य प्रदेश रणनीती-परिषद**

मध्य प्रदेशमध्ये, सिहोर जिल्ह्यातील अमलाहा इथल्या अन्न कडधान्य संशोधन केंद्रात राष्ट्रीय कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय सल्लामसलत आणि रणनीती परिषद आज आयोजित करण्यात येत आहे. डाळ उत्पादन क्षेत्रातील प्रमुख चिंता, सध्याची आव्हानं आणि भविष्यातील शक्यतांवर परिषदेत सविस्तर चर्चा केली जाईल. अध्यक्षस्थानी केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान असतील. त्याचबरोबर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉक्टर मोहन यादव हे देखील कार्यक्रमात सहभागी होतील. ओडिशा, पंजाब, छत्तीसगड, बिहार, गुजरात, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पश्चिम बंगाल यांच्यासह विविध राज्यांचे कृषिमंत्री परिषदेला उपस्थित असतील.

**परीक्षा पे चर्चा**

प्रत्येक विद्यार्थ्याची परीक्षेची तयारी करण्याची आपली अशी एक वेगळी पद्धत असते. विद्यार्थ्यांनी आपल्या या पद्धतीवर विश्वास ठेवणं महत्त्वाचं आहे असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. परीक्षा पे चर्चा या संवादात्मक कार्यक्रमाच्या 9 व्या भागाची ध्वनीचित्रफीत मोदी यांनी काल प्रकाशित केली. या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून परीक्षेचा ताण हलका करण्याबाबत मार्गदर्शन केलं. स्वतःशी प्रामाणिक राहिलात तर खरा आत्मविश्वास मिळेल, स्वप्नं न पाहणं ही सगळ्यात मोठी चूक आहे असं सांगून न घाबरता स्वप्न पाहा आणि थोरांच्या चरित्रातून प्रेरणा घ्या असं आवाहन पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना केलं.

**जिल्हा परिषद निवडणूक**

महाराष्ट्रात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाचपर्यंत मतदानाची वेळ असून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहेत.

काल सर्व ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मतदानाच्या तयारीचा आढावा घेतला. मतदान केंद्रांच्या परिसरात चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**रेल्वे-सीमेंट-वाहतूक**

माल वाहतूक विशेषतः सीमेंटच्या मोठ्या प्रमाणातील वाहतुकीला चालना देण्यासाठी भारतीय रेल्वेने केलेल्या सुधारणांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. टँक कंटेनर मधून मोठ्या प्रमाणावर सीमेंटची वाहतूक करण्यासाठी अनेक सीमेंट कंपन्यांनी भारतीय कंटेनर महासंघाशी संपर्क साधला असल्याचं रेल्वे मंत्रालयाने काल सांगितलं. या वाहतुकीसाठी लागणाऱ्या शुल्कात नुकतीच कपात करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणावरील सीमेंट वाहतुकीसाठी याचा फायदा होणार असल्याचं मंत्रालयाने पुढे म्हटलं आहे.

**आरबीआय**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं चालू आर्थिक वर्षाच्या शेवटच्या द्वैमासिक पतधोरणात रेपो दरात काहीही बदल केलेला नाही. पतधोरण समितीच्या सदस्यांनी एकमतानं हा निर्णय घेतल्याचं आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी काल सांगितलं. 2026-27 या आर्थिक वर्षातल्या पहिल्या तिमाहीत ग्राहक किंमत आधारित महागाई निर्देशांक 4 टक्के राहील असा अंदाज पतधोरण समितीनं व्यक्त केला आहे. महागाई निर्देशांकातली ही वाढ सोन्यासारख्या मौल्यवान धातूंच्या दरात झालेल्या वाढीचा परिणाम असल्याचं मल्होत्रा म्हणाले. सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर पहिल्या तिमाहीत 6 पूर्णांक 9 दशांश टक्के तर दुसऱ्या तिमाहीत 7 टक्के असेल असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**इस्लामाबाद-स्फोट**

इस्लामाबादमधील मशिदीत काल झालेल्या बॉम्बस्फोटाचा भारतानं निषेध केला असून, स्फोटात झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे. परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात, पाकिस्तान आपल्या सामाजिक रचनेला ग्रासलेल्या समस्यांवर गांभीर्यानं तोडगा काढण्याऐवजी, देशांतर्गत समस्यांसाठी इतरांना दोष देऊन स्वतःचीच फसवणूक करत असून ही दुर्दैवाची बाब असल्याचं म्हटलं आहे. हे निराधार आणि निरर्थक आरोप भारत फेटाळून लावत असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**भारत-अमेरिका करार**

भारत आणि अमेरिकेदरम्यान नुकत्याच करण्यात आलेल्या व्यापार करारासंदर्भातील अंतरिम कराराचा मसुदा तयार करण्यात आला असल्याचं, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात म्हंटलं आहे. या करारात अतिरिक्त बाजार उपलब्धता आणि अधिक सुलभ पुरवठा साखळीला प्राधान्य देण्यात आलं आहे. उभय देशांमधील हा अंतरिम करार त्यांच्या भागीदारीतील एक ऐतिहासिक टप्पा ठरेल असं निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. या करारात, भारताकडून, अमेरिकेच्या सर्व औद्योगिक वस्तू आणि अन्न आणि कृषी उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीवरील शुल्क रद्द करण्यात येण्याची शक्यता आहे.

**पीयूष गोयल**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी भारत आणि युरोपियन युनियन दरम्यान परस्पर संवेदनशीलता जपण्याचं, आर्थिक विकासाच्या आणि कृषी पद्धतींच्या विभिन्न टप्प्यांना ओळखण्याचं आणि व्यावहारिक तसंच उभयपक्षी फायदेशीर परिणामांवर लक्ष केंद्रित करण्याचं महत्त्व अधोरेखित केलं. अनंत सेंटरनं आयोजित केलेल्या पहिल्या भारत-युरोपियन युनियन मंचाला संबोधित करताना त्यांनी काल ही टिप्पणी केली. युरोपियन युनियन सदस्य राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्वागत झालेला भारत-युरोपियन युनियन व्यापार करार वेगानं पूर्ण केला जाऊ शकतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. समांतर कायदेशीर आणि भाषांतर प्रक्रियेद्वारे हा करार पूर्ण करता येणं शक्य असून त्यामुळं जागतिक व्यापाराच्या महत्त्वपूर्ण भागासाठी सामायिक फायदे मिळवण्याचा मार्ग मोकळा होईल, असंही ते म्हणाले .

**मेघालय-स्फोट**

मेघालयमध्ये, पूर्व जैंतिया हिल्स जिल्ह्यात थांगस्को भागातील मिन्सिंगट इथल्या कोळसा खाणीत झालेल्या स्फोटातील मृतांची संख्या 25 झाली आहे. काल रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या शोध आणि बचाव कार्यादरम्यान सापडलेल्या आणखी चार मृतांचा यात समावेश आहे. आतापर्यन्त 17 मृतदेहांची ओळख पटली असून, कायदेशीर औपचारिकता पूर्ण करण्यात येऊन ते त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. आतापर्यंत दोन आरोपींना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आलं असून, त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

**U19-क्रिकेट**

19 वर्षांखालील युवकांच्या 50 षटकांच्या सामन्यांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत झिम्बाब्वेची राजधानी हरारे इथं झालेल्या अंतिम सामन्यात काल भारतानं इंग्लंडचा 100 धावांनी सहज पराभव करून विजेतेपद पटकावलं. भारताचं स्पर्धेतील हे विक्रमी सहावं विजेतेपद आहे. भारतानं दिलेल्या 412 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ 40 षटकं आणि 2 चेंडूत 311 धावांवर आटोपला. तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 50 षटकांत नऊ गडी गमावून 411 धावा केल्या. 14 वर्षीय वैभव सूर्यवंशीनं 80 चेंडूत 175 धावांची दमदार खेळी करत भारताच्या विजयाचा पाया रचला, तर कर्णधार आयुष म्हात्रेनं 51 चेंडूत 53 धावांचं योगदान दिलं. गोलंदाजीत भारताच्या आर. एस. अंबरीशनं तीन बळी घेतले, तर दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहान यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. वैभव सूर्यवंशीनं सामनावीर तसंच स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार पटकावला.

19 वर्षाखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धावांच्या फरकाच्या बाबतीत हा सर्वात मोठा विजय असल्यानं आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारताचा हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपति सी. पी. राधाकृष्णन तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजेतेपदाबद्दल भारतीय क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं. तसंच संपूर्ण स्पर्धेत असामान्य कौशल्यांचं प्रदर्शन केल्याबद्दल समाज माध्यमावर खेळाडूंचं कौतुक करून त्यांना भविष्यातील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. हा विजय असंख्य तरुण खेळाडूंना प्रेरणा देईल असं पंतप्रधानांनी म्हंटलं आहे. केंद्रीय युवक आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांनीही संघाचं अभिनंदन करताना वैभव सूर्यवंशीचा उल्लेख 'गोल्डन बॉय' असा केला आहे.

**T20-क्रिकेट विश्वचषक**

20 षटकांच्या सामन्यांच्या आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला आज सुरूवात होत आहे. भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे स्पर्धेचं यजमानपद भूषवत असून महिनाभर चालणारी ही स्पर्धा 8 मार्चपर्यंत चालेल. 20 आंतरराष्ट्रीय संघांचा समावेश असलेल्या या स्पर्धेत दोन्ही देशांमधील विविध ठिकाणी एकंदर 55 सामने होतील. स्पर्धेत गट टप्प्यांनंतर सुपर 8 आणि बाद फेरीच्या सामन्यांचा समावेश आहे.

भारतीय वेळेनुसार आज सकाळी 11 वाजता स्पर्धेतील पहिला सामना कोलंबो इथल्या सिंहलीज स्पोर्ट्स क्लब मैदानावर पाकिस्तान नेदरलँड्स दरम्यान खेळला जाईल. दुसरा सामना वेस्ट इंडिज आणि स्कॉटलंड यांच्यात कोलकाता इथल्या ईडन गार्डन्सवर दुपारी 3 वाजता खेळला जाईल. गतविजेता भारत आपला पहिला सामना आज संध्याकाळी 7 वाजता मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेविरुद्ध खेळून आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. स्पर्धेचं विजेतेपद सलग दुसऱ्यांदा जिंकून इतिहास रचण्याचा भारताचा प्रयत्न असेल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.